# प्रथा - काही उपआख्याने

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

*(प्रत्येक 'ती' वेगळी आहे.)*

- ती इटालियन. वडिलांबरोबर कुटुंब इंग्लंडला आले. ती इंजिनीअर झाली, काही काळ नोकरीही केली. यथावकाश प्रथेप्रमाणे लग्न केले. दरम्यान वडिलांनी एक हॉटेल काढायचे ठरवले. त्यासाठी एक जुनी इमारत आजूबाजूच्या मोठ्या परिसरासकट विकत घेतली आणि वीस खोल्यांचे हॉटेल बांधून घेतले. राहाण्याच्या खोल्या वरच्या दोन मजल्यांवर होत्या. तळमजल्यावर समारंभासाठी एक मोठा हॉल, बार, रेस्टॉरंट, किचन वगैरे होते. तळघरात विविध प्रकारच्या दारूचा व इतर जास्तीच्या सामानाचा स्टॉक होता.

हॉटेलची सुरुवात ठीक झाली. पण त्या गावाला बाहेरून येणाऱ्यांची संख्याच कमी होती. ते गाव काही पर्यटनस्थळ नव्हते. तेथे खेळांचे राष्ट्रीय स्तरावरचे कार्यक्रम, रेसेसही क्वचित होत. मुळात हॉटेल काढायच्या मागे मालकाचा उद्देश निराळाच होता, दोन-तीन वर्षे हॉटेल तोट्यात गेले की अपघात घडवून ते बंद पाडायचे आणि विमा कंपनीकडून पैसा घ्यायचा. तो इरादा सफल झाला नाही. हॉटेलला दाखवायला आग लावल्यामुळे हॉटेल मात्र नादुरुस्त झाले. ते हॉटेल म्हणून वापरणे अशक्य झाले.

तोपर्यंत त्याची तब्येतही खालावत गेली. मग लग्न झालेल्या मुलीच्या नावे हॉटेल करून त्याने तिच्यावर ते निस्तरण्याची जबाबदारी टाकली. अल्पावधीतच तो मरण पावला.

एव्हाना मुलीला एक मुलगाही झाला होता. ते दुसऱ्या गावी राहात असत. तिच्या लग्नाचे चिन्ह काही ठीक दिसत नव्हते कारण तिला दारू जरा जास्तच आवडू लागली होती. यथावकाश घटस्फोट झाला. यथावकाश मुलगा मोठा झाला, प्रथेप्रमाणे नोकरी करू लागला आणि प्रथेप्रमाणे त्याने लग्नही केले. बायकोबरोबर तो दुसऱ्या गावी राहात असे. तिने स्वतःला एक फ्लॅट हॉटेलच्या जवळ भाड्याने घेतला. कारण हॉटेलमध्ये कोणीच नसल्याने चोऱ्या होऊ लागल्या होत्या. हलवता येईल त्या वस्तू लंपास झाल्या होत्या. उत्पन्नच नसल्याने यथावकाश वीज, गॅस ही बिले थकली. त्यांचा पुरवठा बंद करण्यात आला. नगरपालिकेचा करही हप्त्याने भरायला लागला.

बंद पडलेले असले तरीही ती आता हॉटेलची मालकीण होती. ती रोज एकदा तेथे चक्कर टाके.

हातात आपल्या मालकीची ही शहरातील मोठी प्रॉपर्टी तर आहे, तिचे काय करता येईल हे ती आजमावू लागली. प्रॉब्लेम म्हणजे, ती प्रॉपर्टी सरळ विकता येण्यासारखी नव्हती. तिच्यावर बँक, विमा कंपनी, खासगी व्यवसाय अशा बऱ्याच लोकांचा हक्क होता. त्यामुळे एखादा बिल्डर गाठून आहे ती इमारत व बाजूचा परिसर विकणे शक्य नव्हते. मग आहे त्या परिस्थितीत पैसा कसा मिळवता येईल याचा विचार ती करू लागली. त्यात तिला एक शक्यता दिसली.

हॉटेलचा खालचा हॉल मोठा होता. त्यात सांस्कृतिक कार्यक्रम ठेवायचा. तेथे वीज नसल्याने फक्त दिवसाउजेडीच हे शक्य होते. तरीही जनरेटरवर मिणमिणते दिवे लावायला लागले असते. संध्याकाळच्या कार्यक्रमासाठी जास्तीचे दिवे लावायला लागले असते. तिच्या ओळखीचा एक पियानो शिक्षक होता. त्याच्या त्या

सर्कलमध्ये चांगल्या ओळखी होत्या. त्याच्या ओळखीने तेथे एक संगीताचा कार्यक्रम तिने आयोजित केला. दोन व्हायोलिन वादक बोलावले; पण लोक फारसे जमले नाहीत. संध्याकाळी जेमतेम दिवे तर लावले पण त्या हॉलमधले हीटर्स बंद होते. त्यामुळे लोक थंडीने कुडकुडू लागले व मध्यंतरानंतर बहुतेकांनी पळ काढला. काही लोकांनी तिच्याकडे याबाबत तक्रारही केली आणि तिकिटाचे पैसे परत मागितले. ती पैसे परत करेना मग लोकांनी नगरपालिकेकडे तक्रार केली. मुळात या कार्यक्रमासाठी तिने नगरपालिकेची परवानगीच घेतली नव्हती. त्यामुळे पालिकेने तिच्यावरच दंड ठोठावला.

या अनुभवावरून तिने वेगळा प्रयोग करायचे ठरवले. जागतिक प्रथेप्रमाणे पैसे मिळवण्यासाठी ना-नफा-ना-तोटा अशी सांगायला कागदोपत्री एक स्वयंसेवी संघटना स्थापण्याचा प्रयत्न केला. त्या संघटनेच्या वतीने कार्यक्रम तेथे योजायचे असा प्लॅन होता. म्हणजे व्यक्तिशः तिच्यावर जबाबदारी येणार नाही. मग तिने तो ओळखीचा पियानो शिक्षक आणि त्याच्या एका मित्राला या कामासाठी उद्युक्त केले. त्या हॉलमध्ये प्रदर्शन भरवण्याचे आश्वासन एका स्थानिक चित्रकाराला दिले. त्याच्याकडून नवीन संस्थेचे बॅनर फुकटात करून घेतले.

नव्या संस्थेची घटना, नोंदणीसाठी लागणारे फॉर्म्स वगैरे सरकारी कागदपत्रे तयार करण्यासाठी या मंडळींनी एके दिवशी सकाळी एकत्र भेटायचे ठरवले. हॉटेलात ही होती, चित्रकार आणि पियानोवादक आले पण वादकाच्या दोस्ताचा पत्ताच नव्हता. अशा गोंधळाच्या प्रथेप्रमाणे त्याचा फोनही लागेना. तासभर वाट बघून चित्रकार, पियानोवादक आणि ती जेवायला एक रेस्टॉरंटमध्ये गेले. सभ्यता म्हणून चित्रकाराने वाइन मागवली. हिने आगाऊपणे एक अख्खी बाटली मागवली. चित्रकार दिवसा अल्कोहोल पीत नसे. पियानोवादकाने प्रथेप्रमाणे एक ग्लास वाइन घेतली. हिने अख्खी बाटली संपवली. दारू चढल्याने प्रदर्शनाच्याबाबत चित्रकार ज्या काही मागण्या करत होता, त्या मान्य आहेत असे तिने आश्वासन दिले. चित्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टी त्याने सांगितल्या, एकतर प्रदर्शनाआधी त्याला हॉलला दोन-तीन भेटी द्याव्या लागतील. तो भिंतींचे मोजमाप घेईल म्हणजे त्याला किती चित्रे कशी कोठे लावायची याचा आराखडा करता येईल. त्याच्या दृष्टीने सगळयात महत्त्वाची बाब होती ती अशी - साधारण पन्नास-साठ चित्रे असतील. प्रदर्शन संपायला कितीही उशीर झाला तरी तो सगळी चित्रे त्याच दिवशी परत घेऊन जाईल. चित्रे लावणे आणि उतरवणे यात किती वेळ जातो याचा त्याला अंदाज होता, त्याच्या अनुभवानुसार नवख्या आयोजकांना त्या कामाला किती वेळ लागतो, याची कल्पना नसते. धंदेवाईक गॅलरी असेल, हाताशी तीन-चार मदतनीस असतील तर गोष्ट निराळी. इथे त्यालाच स्वतःला ही हमाली करायला लागणार. तिने त्वरेने संमती दिली. [कारण ती नशेत होती, हे त्याच्या बऱ्याच नंतर लक्षात आले.]

आधी जाऊन त्याने चित्रे कशी लावायची, आखणी, प्रदर्शनाची पत्रिका वगैरे त्याचे काम केले. प्रदर्शन सहा वाजल्यापासून सुरू होणार होते. त्याने एकजण मदतीला घेतला आणि चार वाजताच तो तेथे हजर झाला. येणाऱ्या लोकासांठी भरपूर वाइन, नमकीन वगैरे स्वखर्चाने घेऊन आला. चित्रे हॉलमध्ये नेली आणि त्याच्या लक्षात आले चित्रे बघायला इथे दिवे अगदीच अपुरे आहेत. जास्तीचे दिवे नसतील हे बाईने तेव्हा स्पष्ट केले. आधीच्या भेटीत तेथले कमी दिवे त्याच्या लक्षात आले होते पण प्रदर्शनासाठी बाई जास्तीचे दिवे उपलब्ध करेल असे त्याने गृहीत धरले होते. मग गडबडीत एक मोठा सर्च लाइट आणावा लागला. तो लावल्यावर चित्रे त्याने भिंतींवर लावली. आधी त्याचे भाषण होते, मग लोक चित्रे बघणार. भाषण एका दुसऱ्या खोलीत एका टेबललॅम्पच्या प्रकाशात झाले. फार काही लोक आले नाहीत पण जे आले ते तरी चित्रांमध्ये रस घेत होते. प्रदर्शन नऊला संपले.

आता वेळकाढू आणि कष्टाचे काम सुरू झाले. चित्रे उतरवायची आणि बाहेर कारमध्ये ठेवायची. तो आणि मदतनीस हॉलमधून चित्रे घेऊन हॉटेलच्या बाहेर जात, परत आत येत आणि आणखी चित्रे घेऊन जात. तोपर्यंत

बाई धुंद झाली होती. चकरा मारत हे दोघे चित्रे हलवत होते. अकराच्या सुमाराला हे बाहेर असताना अचानक तिने हॉटेलचे काचेचे मुख्य दार बंद केले. आतून 'आता उद्या' असे हातवारे करत राहिली. चकित होऊन ते निघाले. कोणाच्या तरी कानावर हा प्रकार असावा म्हणून तितक्या उशिरा पियानोवादकाच्या घरी गेले. सुदैवाने तो जागा होता. त्यालाही धक्का बसला कारण आधीच्या चर्चेत चित्रकाराने चित्रे त्याच दिवशी घरी घेऊन जाणार हे स्पष्ट केले होते. पण तेव्हा आणखी काहीच करण्यासारखे नसल्याने ते हताश होऊन घरी आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी परत हॉटेलला हजर. उरलेली चित्रे निमूटपणे गोळा केली. उरलेल्या वाइनची चौकशी करता बाईने वाइन संपल्याचे सांगितले. 'मी ती लोकांना देऊन टाकली'. वस्तुतः लोक त्याच्यादेखतच बाहेर गेले होते. कोणालाही वाइन दिली नव्हती. शिवाय वाइन देणे दूरच, ही तेव्हा धड उभीही राहू शकत नव्हती. घरी आल्यावर लक्षात आले की तीन चित्रे गायब आहेत. त्याने तिला फोन केला. तिने अपेक्षेप्रमाणे 'इथे आता काही नाही' असे सांगितले.

त्याने पोलिसांना फोन केला. पोलिसांना ही बाई आणि ते हॉटेल माहिती होते. त्यांनी 'चित्रे विसरा' असा सल्ला दिला. 'तुम्ही तक्रार केलीत तर तुम्ही तिच्याशी अतिप्रसंग करत होतात म्हणून तिने हॉटेल बंद केले' असे ती म्हणेल असेही सांगितले. 'हे हॉटेल, ही बाई आम्हांला माहीत आहेत. ती कोणत्याही थराला जाऊ शकते.'

मग त्याने नाद सोडला. वाइन आणि तीन चित्रे अक्कलखाती जमा केली. अशी मजा!

- ती ब्रिटिश नागरिक. तिचे बालपण पूर्व आफ्रिकेतील एका देशात गेले. वडील तेथे उच्चपदावर एका ब्रिटिश कंपनीत नोकरीला होते. पण त्यांचा गुप्त कारभार निराळा होता, ते ब्रिटिश सरकारसाठी हेर होते. आफ्रिकेतील त्या देशातील उभरत्या राजकीय व सामाजिक चळवळींची माहिती ब्रिटिश सरकारला वेळोवेळी पुरवत. विशेषतः खाणकामगारांच्या डाव्या चळवळी, त्यांचे नेते वगैरे माहिती. ब्रिटिश सरकारचे व त्या देशात गुंतवणूक असणाऱ्या कंपन्यांचे धोरण यांच्यासारख्या ब्रिटिश व आफ्रिकन लोकांच्या माहितीवर ठरे.

काही वर्षे तेथे काढल्यावर ते ब्रिटनला परत आले. त्यांना एक मुलगी व एक मुलगा. दोघेही चांगल्या शाळेत होते. मुलीने शिक्षण शाळेनंतर थांबवले व ती बीबीसीत नोकरीला लागली. मुलगा पुढे शिकला व इंजिनियर झाला. त्याने स्वतःचा व्यवसायही यथावकाश काढला. तो चांगला चालत असे. भाऊ-बहीण सुरुवातीला एकमेकांच्या जवळचे होते.

बीबीसीमध्ये असताना तिच्या बॉसने तिच्याशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. तिला ते आवडले नाही. तिने आक्षेप घेतल्यावर बॉसने नोकरीवर अनिष्ट परिणाम होईल अशी धमकी दिली. प्रथेप्रमाणे ती घाबरली आणि त्या क्षणी ऑफिस सोडून अक्षरशः रस्त्यावर पळत आली. मग घरी आल्यावर कोठे तिच्या जीवात जीव आला. आई घरी नव्हती. ती वेळ तिची मैत्रिणींबरोबर ब्रिज खेळण्याची असे. परत नोकरीवर जायचे नाही असे तिने ठरवले. वडील कामावरून घरी आल्यावर तिने हा प्रसंग त्यांना सांगितला. तिची अपेक्षा वडील त्या माणसाविरुद्ध काहीतरी तक्रार करतील अशी होती. त्यांनी प्रसंग गंभीरपणे घेतला नाही. 'आता दुसरी नोकरी शोध' एवढेच म्हणाले.

घराजवळ एक अभिनयाचे शिक्षण देणारी संस्था होती. ती तेथे गेली. पैसे देऊन शिक्षणात तिला रस नव्हता पण तेथे स्वयंसेवक म्हणून काम करायला त्या लोकांनी तिला परवानगी दिली. तेथे ती रोज काही तास जात असे. सेट लावणे, सामानाची रचना करणे वगैरे कामे करत असे. वेळ चांगला जाई. नवीन शिकाऊ उमेदवार तरुण मंडळींशीही ओळखी झाल्या. तेथे तिला एक प्रसिद्ध नाटककारही भेटला.

तिच्या घरासमोर एक इटालियन बेकरी होती. तिथे ती अधूनमधून जात असे. तिथे काम करणारा एक तरुण इटालियन मुलगा तिच्याच वयाचा होता. दोघे प्रथेप्रमाणे एकमेकांवर आकृष्ट झाले. प्रथेप्रमाणे ते शारीरिक जवळही आले. तो मुलगा काही काळातच इटलीला कायमचा परत जाणार होता. त्यामुळे प्रथेप्रमाणे त्यांनी हातात असलेला

वेळ उत्कट शारीरिक संबंधात घालवला. त्यात तिला गर्भ राहिला आणि तो मुलगा इटलीला परत गेला. आता तिला जरा प्रॉब्लेम आला. गर्भारपण दिसू लागण्याच्या आत गर्भ पाडणे आवश्यक होते. आई-वडिलांना या संबंधांची माहितीही नव्हती आणि त्यांनी तिला मदतही केली नसती. तिला जवळची अशी मैत्रीणही नव्हती की ही खासगी बाब तिच्या कानावर घालावी. त्यामुळे तिने स्वतःच डॉक्टर शोधला आणि गर्भपात करून घेतला. हे प्रकरण तेथील प्रथेप्रमाणे तिने अनुभवविश्वात भर म्हणून जमा केले.

ती ज्या नाटक कंपनीत जाई, त्यांची प्रायोगिक नाटके बघायला हौशी मंडळीही येत असत. त्यांत तिला नवीन माणूस भेटला. तो वयाने तिच्यापेक्षा १५ वर्षांनी मोठा होता पण दोघांचे जमले. दरम्यान प्रथेप्रमाणे तिला आई-वडिलांबरोबर राहाण्याचा कंटाळाही आला होता. तिने एक नोकरी शोधली आणि घर सोडले. ती त्या माणसाबरोबर राहू लागली. गर्भ राहू नये याची काळजी मात्र घेतली. काही वर्षांतच प्रथेप्रमाणे त्यांचे सहजीवन शिळे होऊ लागले. दरम्यान तिला एक श्रीमंत घटस्फोटित भेटला. तो एका बँकेत मोठ्या हुद्द्यावर होता. लहानपणी पोलिओ झाल्याने त्याचे पाय अधू होते. पहिले लग्न मोडल्यावर प्रथेप्रमाणे तो दुसऱ्या बायकोच्या शोधात होताच. त्याला आधीच्या लग्नाच्या दोन मुली होत्या. त्या त्याच्याचकडे राहात असत.

एकाबरोबर राहात असूनही तिने याच्याशी जवळिक सुरू केली. प्रमुख कारण त्याची श्रीमंती, २५-३० एकर जमिनीवर मालकीची एक जुनी तीनमजली गढी. यथावकाश तिने त्याच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. तिच्या तेव्हाच्या पार्टनरने काही कटकट केली नाही. लग्न ठरल्यावर नव्या माणसाने प्रथेप्रमाणे तिला अंगठी भेट दिली. तिच्या डोळ्यांत हिरवी छटा असल्याचे त्याला दिसले होते. म्हणून त्याने पाचूची अंगठी तिला दिली. ती प्रथेप्रमाणे खूश झाली. तिला लग्न साधे हवे होते, पण त्याच्यासाठी हा त्याच्या वर्तुळात डामडौल दाखवण्याचा प्रसंग होता. त्यामुळे आलिशान ठिकाणी प्रथेप्रमाणे खर्चिक लग्न झाले.

त्याच्या मुली एव्हाना १७-१८ वर्षांच्या होत्या. प्रथेनुसार हिने त्यांच्याशी प्रेमळपणा सुरू केला. प्रथेप्रमाणे त्यांनी तिला झिडकारले.

प्रथेनुसार त्याच्या मुलींना काही ही पसंत नव्हती. त्यांच्यात आणि तिच्यात वयाचे अंतरही फारसे नव्हते. त्यामुळे घरचा एक भाग त्यांनी वडिलांच्या संमतीने स्वतःकडे ठेवला. तेथे जायला हिला बंदी होती.

यथावकाश दाम्पत्याला एक मुलगा झाला. तो दिसायला जरा विचित्र होता. त्याचे डोके मागून एकदम सपाट होते आणि पुढूनही चेहरा दाबल्यासारखा होता. पण आयुष्यात उशीर झालेला असल्याने प्रथेप्रमाणे तिचा तो तेव्हा आवडता होता.

या मुलाच्या संगोपनावरून दोघांचे खटके उडू लागले. नवरा त्याच्या आईच्या कह्यात होता. प्रथेप्रमाणे तिला ही नवी सून आवडली नव्हती. जरी ते वेगळ्या घरांत राहात असले तरी आईचा रिमोट कंट्रोल त्याच्यावर होता. प्रथेनुसार तिला सासूची ढवळाढवळ आवडत नसे. उदाहरणार्थ, त्यांच्या घराण्यात दुपारी बाराच्या आधी मोत्याचे दागिने घालायचे नाहीत अशी प्रथा होती. ही मध्यमवर्गातून आल्यामुळे हिला असल्या प्रथा माहिती नव्हत्या. मग तिची कुचेष्टा होई.

मुलाला वाढवण्यावरून मतभेद होते. दोघे प्रथेनुसार दुसऱ्याला न कळेल अशा खुफिया रीतीने मुलाचे लाड करत. त्यामुळे मुलगा गोंधळात पडे. पण लवकरच दोघांकडूनही बक्षिसी मिळवायला तो शिकला. तरी ही रस्सीखेच आणि लपवाछपवी दीर्घकाळ चालणे शक्य नव्हते. तेव्हा दुसरा जन्म झाला. ही मुलगी. आपले नाव, पैसा मुलगा पुढे चालवेल, मुलीचा भरोसा नाही. या जागतिक प्रथेनुसार त्याला मुलगी झाली हे काही फारसे पसंत पडले नाही. मग दोघांच्यातील अंतर वाढू लागले. त्यात तो मिळवता असल्याने, मुलासाठी विशेष भेटी, खेळणी आणे, मुलीसाठी नाही. मग याच्याकडून पैसे मागून प्रथेनुसार ती मुलीसाठी काहीतरी आणे. तिला परत एकदा गर्भ राहिला पण तो टिकला नाही. एकदा बाहेरून घरी येताना घराच्या प्रचंड आवारातील एका झाडाखाली तिचा गर्भपात झाला. ती मुलगी होती. ही गोष्ट नवऱ्याच्या कानावर तिने घातली. त्याने त्याकडे दुर्लक्ष केले.

यथावकाश बायकोशी शरीरसंबंध संपल्याने प्रथेनुसार त्याने दुसरी बाई शोधली. त्याची एकूण पावले ओळखून तिने त्यांच्या संबंधांची नोंद ठेवायला सुरुवात केली. ते कोठे केव्हा किती काळासाठी भेटत, इत्यादी माहिती एका व्यावसायिक हेराकडून ती मिळवत असे. कालांतराने प्रथेनुसार त्यांना घटस्फोटाला पर्याय नाही हे समजून चुकले. त्याची इस्टेट प्रचंड असल्याने हा मामला साधा नव्हता. तिला वैवाहिक आयुष्याच्या वर्षांसाठी खणखणीत मोबदला हवा होता. दुसरा प्रश्न मुले कोणाकडे राहणार हा होता. दोघांनीही महागडे वकील शोधले व प्रकरण कोर्टात गेले.

त्याने घराबाहेर काढण्याआधी ती मुलीला घेऊन दुसरीकडे राहू लागली. तो भाड्याचा बंगला त्यांच्या ओळखीच्या माणसाचा होता. तो श्रीमंत होता पण त्याच्याही लग्नात गोंधळ बरीच वर्षे होते. एक मुलगा व्यसनाधीनही होता. ही संभाव्य घटस्फोटिता असल्याने त्याच्या मनात हिच्याशी संबंध ठेवण्याचे विचार प्रथेनुसार येऊ लागले. सुरुवात म्हणून त्याने त्याच्या घराजवळचा त्याचा बंगला तिला भाड्याने दिला. हिच्यासाठी त्याला आकर्षित ठेवणे पण शरीरसंबंधांपर्यंत न जाणे सोयीचे होते.
मग नवऱ्यावर दडपण आणण्यासाठी तिने वृत्तसंस्थेतील एक वजनदार माणूस शोधला. हा पॅरिसला राहात असे पण काही प्रमुख ब्रिटिश आणि फ्रेंच वर्तमानपत्रांवर त्याचा कंट्रोल असे. मुलीला घेऊन ती त्याला भेटायला पॅरिसला गेली, त्यालाही तिच्या घरी ब्रिटनला बोलावले. तोही घटस्फोटित होता आणि त्याला एक वीस वर्षांचा मुलगा होता. म्हणजे तो 'मोकळा' होता. त्याला वश करण्यासाठी तिने प्रथेनुसार त्याच्याशी एकदोन रात्री शरीरसंबंध ठेवले. नवऱ्याचे नाव फोटोसकट एका मोठ्या वर्तमानपत्रात पहिल्या पानावर छापून आणले. त्यात तिचा लग्नात छळ झाला हेही नमूद केले होते. मग नवऱ्याने कोर्टातून तिला वर्तमानपत्रांशी बोलण्याची बंदी आणली. काम झाल्यावर वर्तमानपत्रात वजन असलेल्या इसमाशी तिने संबंध संपवले.

दरम्यान तिने पहिला वकील बदलला आणि दुसरा शोधला. पहिल्या वकिलाला खटला तिच्या विख्यात नवऱ्याविरुद्ध जिंकणे हा प्रतिष्ठेचा भाग होता. हिचे भले व्हावे हा अगदीच दुय्यम हेतू होता. दुसऱ्या वकिलाने खटला व्यवस्थित चालवून हिला काही लाख ब्रिटिश पौंड पोटगी मिळवून दिली. तिची आयुष्यभराची ददात मिटली.

आता ती नव्या नवऱ्याच्या शोधाला लागली. एक स्थानिक खासदार नुकताच विधुर झाला होता. ती त्याला जवळ करू लागली. प्रथेनुसार त्याच्याबरोबर दोन-चार वेळा झोपलीही. त्याला आकर्षित ठेवण्यापेक्षा त्याची ती शारीरिक क्षमता तिला आजमवायची होती कारण तो वयस्क होता. त्या दृष्टीने तो ठीक निघाला. एकदा त्याच्या मतदारसंघात प्रचंड पावसाने पूर आले. हा भर रात्री परिस्थिती बघायला गेला. हिने त्याला स्पष्ट विचारले की तो लोकांच्या काळजीने गेला का आपली इमेज शाबूत राखण्यासाठी. त्याने इमेज शाबूत राखण्यासाठी असे प्रामाणिकपणे कबूल केले. काही महिन्यानंतर तो प्रथेनुसार लग्नाचा विषय काढू लागला. मग तिने त्याला कटवले, म्हणजे, परत तिचा नवऱ्याचा शोध चालू राहिला. अखेर या उच्चस्तरीय पुरुषांचा नाद सोडून तिने एका शेतकऱ्याला पटवले.
दरम्यान नवऱ्याने कोर्टकचेऱ्या करून मुलग्याला आपल्या ताब्यात घेतले. ती त्याला महिन्यातून फक्त एकदा काही तासांसाठी भेटू शकेल असा निर्बंध आणला. तिच्यासाठी हा मोठाच पराभव होता. आई म्हणून तिला मुलांच्यात तसा फारसा इंटरेस्ट नव्हता पण नवऱ्याने कुरघोडी करावी हे तिला खुपले.

यथावकाश ती आणि तो शेतकरी यांचे लग्न झाले व त्यांचा संसार सुरू झाला.

- ती विशीतील रोमानियन मुलगी. आई तिच्या लहानपणीच गेलेली, वडील भक्कम दारुडे, दोन धाकटे भाऊ. ते नीट शिकले नाहीत. एक अमली पदार्थ सेवनाच्या आहारी गेलेला होता. दुसरा भाऊ रझवान बहुधा हॉस्पिटलमध्ये

असे. त्याच्या जन्मानंतर लगेचच त्याला रक्त देण्याची वेळ आली होती. ते रक्त दूषित होते. एका एड्सग्रस्त माणसाचे रक्त दिले गेले. दिल्या जाणाऱ्या रक्ताची कसून तपासणी करण्याची सुविधा रोमानियात तेव्हा उपलब्ध नव्हती. जन्मापासूनच तो विकारग्रस्त राहिला आणि आता अठरा वर्षांचा विकलांग रुग्ण होता. त्यामुळे त्याला अनेक मानसिक विकारही होते. आताही तो हॉस्पिटलमध्ये दाखल होता, आधी कमालीची गरीबी, त्यात असहनीय कौटुंबिक परिस्थिती. विकसित पश्चिम युरोपातल्या देशांत म्हणजे ब्रिटन, फ्रान्स, जर्मनीमध्ये जरा तरी सामाजिक सुरक्षा असते. रोमानियासारख्या देशात ती जवळजवळ नसतेच. त्यामुळे असा वर्ग समाजाच्या बाहेर राहातो.
त्यात तिला सिगरेटचे व्यसन होते. तिच्याकडून फक्त इच्छाशक्तीच्या जोरावर ती सिगरेट सोडण्याचा प्रयत्न करत असे आणि अयशस्वी होत असे. एकूणच ती निराशाग्रस्त असे. त्यावर उपाय म्हणून घरच्या घरी ती सायकल चालवण्यासारखा थोडाफार व्यायाम करे.

मग पैसे मिळवण्यासाठी तिने एक मार्ग शोधला. ॲडल्ट चॅटमध्ये भाग घ्यायचा. त्यासाठी तशा एका सोशल मीडियावर तिने आपण अशा प्रयोगाला उत्सुक आहोत असे नोंदवले. मग त्यांच्याकडून तिला फोन आला. फोनवरचा माणूस सभ्य होता. त्याने तिची प्राथमिक चौकशी केली आणि सविस्तर बोलण्यासाठी प्रत्यक्ष भेटावे लागेल असे म्हणाला. 'तुम्ही माझ्या ऑफिसला येऊ शकाल का दुसरीकडे भेटायचे? तिला दोन्ही पर्याय असुरक्षित वाटले म्हणून तिने आपल्या घरचा पत्ता दिला. तो तिच्या घरी आला. त्या वेळी तिचा धाकटा भाऊ घरामध्ये पण आतल्या खोलीत होता. दाराची बेल वाजल्यावर या माणसाला तिने घरात घेतले. त्याने त्याचे कार्ड दिले आणि स्वतःची ओळख करून दिली. 'या चॅटमध्ये काय करावे लागेल यांची तुला कल्पना आहे का' असे विचारले. फोनवर प्रौढ पुरुष असतील, त्यांच्याशी शृंगारिक संभाषण करावे लागेल असा तिचा समज होता. ते तिने त्याला सांगितले आणि त्याला माझी हरकत नाही असे म्हणाली. त्यावर त्याने सविस्तर माहिती दिली.

प्रथम तिला त्यांच्याशी लेखी कॉँट्रॅक्ट करावे लागेल, तिच्या चेहऱ्याचे पुढून व बाजूने तसेच तिचे संपूर्ण नग्न फोटो त्यांना द्यावे लागतील, ते फोटो वेगवेगळया शारीरिक अवस्थेत असतील. फोटो त्यांचा फोटोग्राफर स्टुडिओत काढेल. हे फोटो ते त्यांच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करतील, जे उत्सुक असतील ते तिला कॉँटॅक्ट करतील. चॅट व्हिडियो वर असेल, तिला हळूहळू कपडे काढत किंवा सुरुवातीपासून संपूर्ण विवस्त्रावस्थेत त्या माणसाशी अगदी स्पष्ट ग्राम्य भाषेत लैंगिक बोलावे लागेल, तशा हालचाली कराव्या लागतील. चॅटचे स्वरूप असे असेल. काय व कसे बोलायचे, हालचाली इत्यादी ट्रेनिंग आमची एजन्सी देईल असेही सांगितले. हा व्हिडियोचा भाग तिला अनपेक्षित होता. त्यामुळे ती जरा चकित झाली.

त्याने हेही नमूद केले की अशा चॅटमध्ये तिला पैसे फार मिळणार नाहीत. 'जास्त पैशासाठी तुला छोट्या फिल्ममध्ये काम करावे लागेल, त्या दोन-तीन मिनिटांपासून तासाभराच्या असू शकतील, या फिल्म्सचे शूटिंग आमच्या स्टुडिओत होईल. त्या फिल्म्ससाठी एका किंवा जास्त व्यक्तींशी निःसंकोच नग्न कामक्रीडा करावी लागेल. पुरुष आणि प्रसंगी स्त्रिया. त्या फिल्म्समध्ये खूपच जास्त पैसा असतो. तुझे वय लक्षात घेता आणखी काही वर्षे तरी तू हा व्यवसाय करू शकशील. एकदा जरा प्रसिद्धी मिळाली की कामे येऊ लागतील. तुला इंटरेस्ट असला तर आणखी एका मीटिंगमध्ये या कामाची तपशीलवार माहिती आम्ही देऊ.' आता ती जरा सावध झाली आणि विचार करते असे म्हणाली. पहिल्या मुलाखतीत असाच प्रतिसाद मिळतो याची त्याला कल्पना होती. लगेच तिच्यावर निर्णयाचे दडपण आणणे श्रेयस्कर नव्हते. म्हणून त्याने तुझा काय विचार होईल ते मला फोनवर कळव असे सांगितले व तो गेला.

दार बंद झाल्याचे ऐकून तिचा भाऊ बाहेर आला. 'मी तुमचे संभाषण ऐकले. माझी बहीण असल्या धंद्याला लागणे मला अजिबात पसंत नाही. मी व्यसनी आहे, शिकलो नाही आणि मिळवतही नाही पण जर तू या

व्यवसायात गेलीस तर मी आत्महत्या करेन.' असे त्याने तिला बजावले. 'अरे, माझे शिक्षण नाही, मला नोकरी मिळण्याची शक्यता नाही. बाबा चोवीस तास दारूच्या नशेत असतात. घर चालवायला पैसे तर लागतात ना? शिवाय रझवान गेली कित्येक वर्षं हॉस्पिटलमध्ये आहे. तो खर्च आहेच.' पण ती गोंधळात पडली. तो त्याच्या खोलीत गेला.

तेवढ्यात दार उघडून वडील आत आले. त्यांचे कपडे चुरगळलेले होते व तोलही जात होता. दारूच्या वासाने घर भरून गेले. ते जेमतेम आत आले आणि बूट न काढताच सोफ्यावर आडवे झाले. आणखी काही तास ते तसेच राहाणार हे तिला अनुभवाने माहिती होते. म्हणून ती किचनमध्ये गेली. सुन्न होऊन विचार करू लागली. संध्याकाळी तिने भावाच्या खोलीचे दार वाजवून पाहिले. हाकही मारली की जेवायला येतोस ना. काही उत्तर नाही आणि दारही आतून बंद केलेले. हताश होऊन ती किचनमध्ये गेली आणि काहीतरी स्वतःला खायला घेतले, मग बाहेर येऊन टीव्ही लावला आणि बघत बसली. जरा वेळाने ती तिच्या खोलीत गेली.

असे दोन-तीन तास गेले असतील, मग मध्यरात्री वडिलांना जाग आली. ते बाथरूमला गेले, बाहेर येऊन त्यांनी 'खायला काय आहे' असा आरडाओरडा सुरू केला. मुलीने बाहेर येऊन त्यांच्यासाठी खायला काहीतरी आणले. तेवढ्यात फोन वाजला. तिने फोन घेतला आणि ती मटकन् खालीच बसली. 'कोण आहे?' वडिलांनी विचारले. तिला बोलवतच नव्हते. ती फक्त 'रझवान रझवान' म्हणाली आणि हात उडवू लागली. 'हॉस्पिटल? रझवान? ' वडिलांनी विचारले. तिने फक्त मानेने 'हो' असे म्हटले. 'येतो आम्ही' असे कसेबसे फोनवर म्हणाली.

- ती मूळ मेक्सिकन, पण अमेरिकेत स्थायिक झाली. तरी ती स्वतःला लॅटिनच समजे, म्हणजे, दक्षिण अमेरिका खंडातील. तिचे नाव जरा मुस्लीम वाटावे असे होते. अमेरिकेतील मुस्लीमद्वेष प्रखर असल्याने ती ते नाव वापरत नसे. दुसरे ख्रिश्चन नाव वापरे. प्रथेनुसार तिच्या आई-वडिलांचा घटस्फोट झाला होता. पण दोघेही हिला जवळचे राहिले. वडिलांनी नंतर दोन लग्ने केली, आईने तीन. आई दिसायला उतारवयातही सुस्वरूप होती, वडील जास्त करून अमली पदार्थांच्या नशेत असत. अधिक दारू. त्यामुळे त्यांचा अंत लवकर आला. त्यांना हॉस्पिटलमध्ये अखेरच्या दिवशी त्यांची तेव्हाची बायको भेटायला आली. तिने ब्रा घातली नव्हती हे हिच्या कायमचे लक्षात राहिले.

तिचे लग्न एकाशी झाले होते. तिला दोन मुलीही होत्या. थोरली फार जाड होती. हिला ती लहान असतानाही उचलवत नसे. त्या मुली आपल्या सहजीवनात अडथळा आहेत असे त्या अगदी छोट्या असताना नवऱ्याचे मत झाले. एक दिवस तर त्याने दोघींना ठार मारण्याचा प्रस्ताव मांडला. दोन्ही मुलींना घेऊन तिने घर त्याच दिवशी सोडले व परत त्याच्याकडे गेली नाही. नंतर त्याने बरीच आर्जवे केली, तिने दाद दिली नाही.

वेगळ्या गावात तिच्या बहिणीचा एक बंगला होता. ती तो भाड्याने देत असे. हिच्या नशीबाने तो तेव्हा रिकामा होता. तेथे ती मुलींबरोबर राहू लागली. मिळेल ती कामे करून ती घर चालवू लागली.

आई हिच्याकडे राहात असे. आईला वयोपरत्वे विस्मरण सुरू झाले होते. पण हिच्या हालचालींवर तिचे बारीक लक्ष असे. एकटी राहात असल्याने हिला लैंगिक प्रयोग शक्य होते, तिला त्यात उत्साहही होता. म्हणून ती तसे सुख देणारी आयुधे विकत घेत असे. तसेच तिच्याकडे पॉर्न मॅगझिन्सही असत. आई तो संग्रह शोधून वेळोवेळी कचऱ्यात टाकत असे. यथावकाश आपला लैंगिक कल पुरुष व स्त्रिया दोघांकडेही आहे हे तिच्या लक्षात येऊ लागले. पण पुरुषांपेक्षा तशा कलाच्या स्त्रिया मिळणे अवघड असते हेही तिच्या लक्षात आले. स्त्री व पुरुष दोन्ही आवडत असले तरी त्यातही पुरुष तिला जास्त आवडत. अशाच एकाच्या प्रेमात ती प्रथेप्रमाणे

अल्पावधीसाठी पडली. त्याला ती 'Dios' म्हणत असे. 'Dios' म्हणजे देव. तिला तो तेव्हा देव होता. लॅटिन संस्कृतीत शरीरावर काहीतरी गोंदवण्याची पद्धत आहे. तिने 'Dios' असे तिच्या हृदयावर म्हणजे, छातीवर गोंदवून घेतले. दोन-तीनदा ती समविचारी स्त्रियांना भेटायला लांबच्या गावांनाही गेली पण त्या ट्रिपा व्यर्थ ठरल्या.

तिचा लैंगिकतेचा मोकळा दृष्टिकोन ऐकून एकजण दुरून, दोनशे किलोमीटरवरून तिला भेटायला आला. त्याचा लैंगिक कल कुत्री, मेंढ्या, गाढवे अशा जनावरांबरोबर लैंगिक संबंध ठेवण्याचा होता. त्यात ती सहभागी होईल का अशी त्याची पृच्छा होती. तिने नकार दिला.

- ती ब्रिटिश. साध्या घरातून आलेली. शाळेपलीकडे शिक्षण नाही. लग्न लवकर झाले. प्रथेप्रमाणे दोन मुलेही झाली. एक मुलगा आणि एक मुलगी. प्रथेप्रमाणे लग्न आधी जरा तणावाचे झाले. मग घटस्फोटापर्यंत गेले.
विभक्त झाल्यावर तिने एका दवाखान्यात नोकरी घेतली. साफसफाई करणे हे सुरुवातीला काम होते. ते ती प्रामाणिकपणे करे. यथावकाश तिने नोकरीत असताना वेगवेगळे कोर्सेस केले आणि ऑफिसचे बैठे काम करू लागली. बरेच पेशंट्स होते, त्यांचे रेकॉर्ड ठेवणे. जे पुढे आणखी कन्सलटिंगसाठी पाठवायचे त्यांची नोंद ठेवणे, मालकांपैकी एका डॉक्टरला कॉम्प्युटरवर रिपोर्ट्स बघता येत नसत. त्याच्यासाठी प्रिंट्आउट काढायला लागे. हे काम वेळखाऊ असे. यथावकाश बढती मिळत ती ऑफिस मॅनेजर झाली. ती नोकरीत समाधानी होती आणि एकटीच राहात असे. मॅनेजर म्हणून कामात प्रमुख आणि तणावाचे काम म्हणजे तात्पुरते डॉक्टर शोधणे. कामावरचा एखादा डॉक्टर अचानक सकाळी आज येऊ शकत नाही असे कळवे. मग कोणी डॉक्टर इतक्या छोट्या अवधीच्या विनंतीने उपलब्ध होतो का हे पाहावे लागे आणि त्याला बोलवावे लागे. अनुपस्थित डॉक्टरचे पेशंट्स त्यांच्याकडे सुपूर्द करावे लागत. दवाखाना एक डॉक्टर नाही म्हणून बंद ठेवता येत नसे.
वर्षाकाठी एक काम ती हौसेने करे. ते म्हणजे दवाखान्याचे सगळे कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी हॉटेलमध्ये जेवणाचे आयोजन करणे. बहुधा हे जेवण ख्रिसमसच्या आधी असे. येऊ शकणारी मंडळी, त्यांची खाण्याची विशिष्ट निवड, ती त्या रेस्टोरंटला कळवणे, इत्यादी.
एक गोष्ट नमूद करण्यासारखी म्हणजे, हा दवाखाना दोन इजिप्शियन डॉक्टर्सच्या मालकीचा होता. त्यामुळे तिला प्रोत्साहन मिळत गेले. तेच ब्रिटिश डॉक्टर्स असते तर ही प्रगती झाली असती का हे संशयास्पद आहे.

यथावकाश तिच्या मुलीचे लीव्ह इन पार्टनरशी जमेना. त्यात ती पडली आणि पाय फ्रॅक्चर झाला. तिला राहायला जागा नव्हती म्हणून ती हिच्याकडे आली. ही अनेक वर्षे एकटी राहात असल्याने तिला घरात दुसरे कोणी - अगदी मुलगीसुद्धा - वावरणे जड गेले. ही एक नवीन प्रथा. कारण काहीही असो - नवऱ्यापासून विभक्ती, नवऱ्याचा मृत्यू, मुले परदेशी असणे वगैरे पण एकटे राहाणाऱ्या वृद्ध स्त्रियांना एकटेपणा हे स्वातंत्र्यही वाटते. मनूच्या स्त्री स्वातंत्र्याच्या संकल्पनेला स्त्रियांनी दीर्घ आयुष्य हे उत्तर दिलेले दिसते. आता मला हवे तसे मी वागेन, मला कोणाची मर्जी सांभाळायला नको किंवा हुकूमतही नको. अशी काही वर्षे गेली की त्यांना कोणी घरी रहायला येणे नको होते. त्यात ही मुलगी घरातून हलणार केव्हा हेच अनिश्चित होते. मात्र तिचा पाय बरा झाल्यावर हिनेच दुसऱ्या गावात तिच्यासाठी नोकरी शोधली व तिला निरोप दिला.

मुलग्याबद्दल तिची तक्रार नव्हती. तो दुसऱ्या गावी नोकरी करायचा. त्याचा प्रमुख छंद नाटक होता. त्यातही शेक्सपिअरची नाटके. त्या नाटकांचे प्रयोग असत त्या गावांना तो कंपनीबरोबर फिरत असे.

यथावकाश ती निवृत्त झाली. पेन्शन चैन करता येईल एवढे नसले तरी पुरेसे होते. उदरनिर्वाह चालत असे. घर स्वतःचे होते. अधूनमधून बूट, कपड्यासारखी एखादी अनावश्यक खरेदी करणेही परवडत असे.

आता एकटे राहावे, मित्र-मैत्रिणींबरोबर एखाद्यावेळी एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला जावे इतपतच तिचे सामाजिक अभिसरण राहिले आणि त्याला तिची तक्रार नव्हती. बाकी महागडे छंदही नव्हते, घरामागे लहानशी मोकळी जागा होती. त्यात ती बागकाम आवडीने करत असे. सुबक आकाराची हिरवळ, अनेक प्रकारची फुलझाडे यांची नियमित देखभाल करे. वर्षातील थंडी, बर्फ नसणाऱ्या महिन्यात हवामान अनुकूल असे. तेव्हा या कामात दिवसाचा बराचसा वेळ चांगला जाई. थोडेफार विणकामही ती कधीकधी करत असे. एकूण संथगतीचे जीवन तिला मानवले होते

अलीकडची एक कायमची कटकट म्हणजे तिची कार जुनी होत चालली होती. तिच्यावर टाळता न येण्यासारखे खर्च वाढतच चालले होते, त्यात दरवर्षीचा वाढता विमा. नवीन दुसरी, अगदी सेकंड हॅन्ड गाडी घ्यायला तिच्याकडे पैसे नव्हते. त्यामुळे स्वतःचे स्वतः मनसोक्त बाहेर फिरता येत नसे व आवश्यक बाजारहाटातही अडचण येई. हा आपल्या यापुढच्या आयुष्याचा अविभाज्य भाग म्हणून तिने स्वीकारला होता. पण आणखी म्हातारपण, आली तर विकलांग अवस्था या विचाराने ती अधूनमधून अस्वस्थ होई. प्रथेप्रमाणे काळजी घ्यायला घरी नात्याचे कोणी नाही, वृद्धाश्रम हा परवडणारा पर्याय नाही.

सध्या दूरच्या विनापाश सक्षम व सचोटीच्या नातलग स्त्रीच्या शोधात ती आहे. [विनापाश, सक्षम, प्रामाणिक या अटी एकेकही  तशा कठीणच!] जवळच्या लोकांना, मुलग्यालाही ही गरज तिने सांगितली आहे. ‘आला दिवस आपला’ हा दृष्टिकोन अगदी पटल्यामुळे नाही तर जरा अगतिकपणाने ती बाळगून आहे.

**– पुरन्दरे चन्द्रशेखर**
email: ckpurandare@gmail.com